
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 1'8

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, २१ जून, १९७२ | अंक ११





## तुमची सही,
## आणि फक्त पाच रुपये ...

बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये तुमचे बचत खाते सुरू करायला पुढच्या गोष्टी पुरेशा आहेत... खाते सुरू करण्यासाठी अर्ज भरणे ही एका मिनिटाची बाब आहे. आणि सुरुवातीची किमान ठेव आहे फक्त पाच रुपये!

अशा तऱ्हेनं आमचे खातेदार होणं पण किती सोपं आहे! या बचतीमुळे तुम्हाला मिळेल—एक प्रसन्न, शांत भविष्यकाल—सुस्थिर भविष्यकाळ. तुमची बचतीची सवय वाढीस लागेल. बचत करा . भविष्याची ती तरतूद आहे.

आजच बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बचत खाते सुरू करा .. या वर्षातील तुमच्या जीवनातील सगळ्यात महत्वाची घटना कदाचित तीच असल !

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस ११७७ बुधवार पेठ, पुणे २

## रौप्य महोत्सव

# दि बँक ऑफ कराड लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

रजि. ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड (जिल्हा-सातारा)

रौप्य महोत्सवानिमित्त बँकेचे भागधारक, ठेवीदार व ग्राहक यांना शुभेच्छा

रौप्य महोत्सव गुरुवार दिनांक ८ जून १९७२ रोजी
नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण, अर्थमंत्री, भारत सरकार
यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला.

## संचालक मंडळ

(१) श्री. म. वि. खंडकर, चेअरमन आणि चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसर, कराड.
(२) श्री. म. रा. देशपांडे, कराड.
(३) श्री. ना. बा. बुधकर, कराड.
(४) श्री. रा. अ. अराणके, कराड.
(५) श्री. मा. ग. परांजपे, पलूस (जि. सांगली)
(६) डॉ. वा. गो. देशपांडे, कराड.
(७) श्री स. मा घाटगे, कोल्हापूर.
(८) श्री. भू. चं. दलाल, मुंबई.
(९) श्री. रा. वि. वेलणकर, सांगली.

वसूल भांडवल आणि रिझर्व्हज् : रु. १० लक्ष, ८५ हजार.
ठेवी : रु. ३ कोटी, ७७ लक्ष, ४ हजार.

ठेवीवरील व्याजाचे दर

१ वर्ष ते ५ वर्षांचे वर - साडे सहा टक्के ते सात पूर्णांक तीन चतुर्थांश टक्के.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

शाखा :
पुणे - १०, बुधवार पेठ, पुणे २,
मुंबई, सातारा, इस्लामपूर, विटे, तासगाव, कोल्हापूर, मलकापूर, भोर, ताकारी, संगमेश्वर.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २१ जून, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

---

## दूषित भौतिक परिस्थितीचा माणसाला धोका

नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनिर्बंध वापर केल्यामुळे मनुष्याभोवतालची परिस्थिती त्याला मारक ठरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. स्टॉकहोम येथे ह्या महत्त्वाच्या विषयासंबंधी विचार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली होती. भौतिक परिस्थिती किती दूषित झाली आहे ह्याची कल्पना संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या एतद्विषयक अहवालातील माहितीवरून चांगली येते. उत्पादनाच्या आधुनिक पद्धती वापरण्यासाठी कारखान्यांतून कोळसा, खनिज तेल, इत्यादी जळणे वापरण्यात येतात. कारखान्यांच्या धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे गेल्या शतकात हवेतील कार्बन डायऑक्सॉइड ह्या विषारी वायूचे प्रमाण १० टक्क्यांनी वाढले आहे. औद्योगिक इंधनाचा खप असाच वाढत राहिला तर इ. स. २००० च्या सुमारास ह्या वायूचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. ज्याचा निचरा होत नाही अशा वायूचे प्रमाण वाढत गेले तर पृथ्वीवरील तपमान झपाट्याने वाढू लागेल आणि उत्तर ध्रुवावरील बर्फ वितळण्याचा धोका उत्पन्न होईल. समुद्रातील प्राणिजीवनावर विपरीत परिणाम होईल आणि समुद्रकाठी असलेल्या शहरांना जलप्रलयाला तोंड द्यावे लागेल. उत्पादनाच्या आधुनिक तंत्रामुळे घाण, कचरा ह्यांची फार मोठ्या प्रमाणावर अडगळ उत्पन्न होते. ह्या अडगळीची वाट न लागल्यामुळे हवापाणी, जमीन दूषित होऊन आरोग्य बिघडण्यास मदत होते.

औद्योगीकरणाच्या आघाडीवर असलेल्या अमेरिकेत घाणकचरा केवढ्या मोठ्या प्रमाणावर साचतो ते पुढील आकड्यावरून दिसून येते. अलीकडील एका वर्षात अमेरिकेत ७० लाख मोटारगाड्या जुन्या झाल्या व म्हणून अडगळीत फेकून देण्यात आल्या. ह्या लोखंडी कचऱ्यासाठी कितीतरी मोठी जागा अडवावी लागली. २ कोटी टन कागद असाच कचरापेटीत टाकावा लागला. अन्नपदार्थ व इतर वस्तूंचे ४८०० कोटी डबे व आवरणे साठली आणि ती कशी नाहीशी करावी असा प्रश्न उत्पन्न झाला. त्याशिवाय कारखाने, मोटारींची एंजिने आणि वीजनिर्मिति-केंद्रे ह्यांमधून बाहेर पडलेला १४·२ कोटी टन विषारी धूर हवेत फेकला गेला. अर्थातच हवा आरोग्याला घातक झाली. शहरांची अमर्याद वाढ झाल्यामुळे मोकळी जागा दुरापास्त झाली. त्याशिवाय जमिनीची धूप आणि जमिनीत साठत जाणारा क्षार ह्यांमुळे कितीतरी जमीन पिकास अयोग्य होत आहे व झाली आहे. अशा कारणांनी ५० कोटी हेक्टर जमीन लागवडीस निकामी झाली आहे. जगातील जंगलांपैकी दोनतृतीयांश जंगल निरुपयोगी झाले आहे. अनादिकालापासून पृथ्वीवर नांदणाऱ्या अनेक पशुपक्ष्यांच्या जाती नाहीशा झाल्या आहेत. अशा नामशेष झालेल्या पशुपक्ष्यांच्या जातींची संख्या १५० च्या तरी आसपास आहे. त्याशिवाय जंगलात राहणारे १,००० जातींचे पशू दुर्मिळ झाले आहेत. जगातील वाढती लोकसंख्या आणि शहरांचा अनिर्बंध विस्तार ह्यांमुळे कोट्यवधी लोकांना गलिच्छ वस्त्यांतून घाणेरड्या जागांत जगावे लागत आहे.

---

## साखरेवरील नियंत्रण करार रद्द करणार

साखर उद्योगधंद्याने येत्या ३० तारखेपासून साखरेच्या दराचे स्वेच्छेने स्वीकारलेले नियंत्रण रद्द करण्याचे ठरविले आहे. सध्या एकंदर उत्पादनापैकी ६० टक्के उत्पादन साखरकारखाने शिधा वाटप दुकानांतून ग्राहकांना पुरविण्यासाठी देतात. वाटपात मिळणाऱ्या साखरेच्या एका गोणीची किंमत १५० रुपये असते. साखरेच्या वाटपाची ही व्यवस्था १९७२ च्या जानेवारीपासून चालू करण्यात आली. तीप्रमाणे ग्राहकांना दर किलोला २ रुपये ह्या दराने साखर देण्यात येते. त्यापूर्वी १९७१ च्या शेवटच्या तिमाहीत महाराष्ट्र राज्यातील साखरकारखाने आपल्या उत्पादनापैकी सुमारे निम्मे उत्पादन दर गोणीला १२९ रुपये दराने वाटपाखाली देत असत आणि ग्राहकाला किलोला १·८० रुपये दराने साखर देण्यात येत असे.

साखरेच्या ग्राहकांना उत्पादनापैकी काही हिस्सा साखर ठराविक दराने मिळावी अशी जर सरकारची इच्छा असेल तर आता वाटपावर कायदेशीर नियंत्रण बसवावे लागेल. कारण, सरकार आणि कारखाने ह्यांच्यातील उभयसंमत करार संपुष्टात येणार आहे. उत्तर भारतामधील साखरकारखाने आणि दक्षिण भारतामधील कारखाने ह्यांच्यात वाद उत्पन्न झाल्याने हा प्रसंग ओढवला आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यातील साखरकारखान्यांचे म्हणणे असे आहे की वाटपासाठी देण्यात येणारी साखर आणि खुल्या बाजारात विकली जाणारी साखर ह्या दोन्ही व्यवहारांत त्यांना बराच काळ तोटा सहन करावा लागला आहे.

उसाच्या दर टनाला ११५ ते १३५ रुपये दर त्यांना शेतकऱ्याला द्यावा लागला आहे. शिवाय गेल्या हंगामाच्या मानाने

त्यांचे गळितही ६० टक्के असून साखरेचा उताराही कमी झाला आहे. उलटपक्षी, दक्षिण भारतामधील कारखान्यांनी विशेषतः तामीळनाडूमधील कारखान्यांनी चालू हंगामात सपाटून नफा मिळविला आहे. म्हणून उत्तरेकडील कारखान्यांतर्फे अशी सूचना करण्यात आली की वाटपासाठी त्यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या साखरेच्या हिश्शात कपात करण्यात यावी, आणि ह्या साखरेच्या दरात योग्य ती वाढ करण्यात यावी. त्याचबरोबर दक्षिणेतील साखरकारखान्यांकडून वाटपासाठी घेण्यात येणाऱ्या साखरेचा हिस्सा वाढविण्यात यावा. कारण, हे कारखाने ८० ते ८५ रुपये टन ह्या दराने ऊस खरेदी करत असून मोठे नफे कमावीत आहेत. दक्षिणेतील कारखान्यांचे म्हणणे असे आहे की गेल्या काही वर्षांत त्यांनी भरपूर नुकसान सोसले आहे. ह्या काळात उत्तरेतील कारखाने भरपूर नफा मिळवीत होते. तेव्हा आता दक्षिणेतील कारखान्यांना नफा मिळविण्याची संधी मिळाली असता त्याबद्दल मत्सर वाटण्याचे कारण नाही. ह्या वादाचा निकाल सामोपचाराने लागू शकला नाही. सरकारही ह्या बाबतीत काही करू शकले नाही. म्हणून स्वेच्छेच्या, अंशतः किंमत नियंत्रणाची योजना रद्द करण्याचा निर्णय कारखान्यांनी घेतला. सरकारने ते मानले नाही तर कोर्टाचा मार्ग कारखान्यांना मोकळा आहे. स्वेच्छेच्या नियंत्रणाची योजना चालू असेपर्यंत कोर्टात जाता येत नव्हते.

---

## बेकारीच्या चित्राचे जवळून दर्शन

कौन्सिल फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेच्या शास्त्रीय आणि तांत्रिक मनुष्यबळाचा आढावा घेणाऱ्या शाखेने देशातील बेकारीचा एरवीपेक्षा काहीसा तपशीलवार अभ्यास केला आहे. त्यासाठी १९७१ साली करण्यात आलेल्या शिरगणतीतील माहितीचा उपयोग करून घेण्यात आला आहे. त्यावरून असे दिसते की कला आणि शास्त्र ह्या ज्ञानशाखांतील पदवीधरांपैकी एकचतुर्थांश पदवीधर नोकरीच्या शोधात फिरत आहेत. शास्त्रीय, एजिनिअरिंग आणि वैद्यकीय पदवी मिळविलेले १ लाख, ९४ हजार सुशिक्षित रोजगाराच्या शोधात आहेत तर ३ लाख, ८५ हजार कला व शास्त्र विषयांचे पदवीधर बेकार आहेत, नोकरीच्या शोधात अयशस्वी झाल्यामुळे १ लाख, २६ हजार कला व वाणिज्य पदवीधरांनी प्रयत्न करणेच सोडून दिले आहे. ३२ हजार शास्त्रज्ञ, एंजिनिअर्स आणि डॉक्टर्सपैकी २२ हजार स्त्रिया आहेत. ह्या सर्वांनी नोकरीचा शोध सोडून दिलेला आहे. ही धडपड आता त्यांच्याच्याने होत नाही असे दिसते. सुशिक्षित लोकांच्या बुद्धीचा उपयोग किती कमी करून घेण्यात येतो हे बेकार स्त्रियांच्या संख्येवरून चांगले स्पष्ट होते. अशा स्त्रियांपैकी १ लाख, २५ हजार स्त्रियांनी रोजगार मिळविण्याचे प्रयत्नही सोडून दिले आहेत. सुमारे १ लाख, १० हजार स्त्रिया उपोगविनिमय खात्याच्या याद्यांवर आहेत. सुशिक्षित बेकारांतील स्त्रियांची संख्या आता ४२ टक्क्यांपर्यंत वाढलेली आहे. पदवी नंतरच्या अभ्यासक्रमाची पूर्तता केलेल्या लोकांत बेकारीचे प्रमाण काहीसे कमी आहे. समाजशास्त्रविषयक पदव्या घेतलेल्यांत बेकारीचे प्रमाण १६ टक्के आहे तर शास्त्रीय व तांत्रिक विषयाच्या दुहेरी पदवीधरांत हेच प्रमाण १३ टक्के आहे. एकच पदवी घेतलेल्या लोकांत ह्याच ज्ञानशाखांतील बेकारीचे प्रमाण अनुक्रमे २४ टक्के आणि २५ टक्के असे आहे. गुरांचे डॉक्टर्स व इतर वैद्यकीय पदवीधर ह्यांच्यातील बेकारीचे प्रमाण सर्वांत कमी म्हणजे अनुक्रमे १·५ टक्के आणि १·७ टक्के असे आहे. एक पदवी घेतलेले आणि दोन पदवी घेतलेले डॉक्टर्स ह्यांच्या बाबतीतही हेच प्रमाण आहे. सगळ्यांत दैना आहे ती इंजिनीअर्स आणि तंत्रज्ञ ह्यांची आहे.

---

## दक्षिण व्हिएटनामवर आर्थिक अरिष्ट

दक्षिण व्हिएटनामच्या सध्याच्या सरकारला सर्वस्वी अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. हे परावलंबन फक्त युद्धापुरतेच मर्यादित नाही. त्या देशाची सर्व अर्थव्यवस्थाच अमेरिकन लष्कर तेथे करीत असलेल्या खर्चाच्या पांगुळगाड्याने चालली आहे. शहरांतून बेकारीचे स्वरूप फार भयानक आहे. अमेरिकन लष्कर हळूहळू काढून घेण्यात येत असल्याने बेकारांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. शहरांमधील बेकारीवर लवकरच काही उपाय शोधून काढण्यात आला नाही तर देशभर दंग्यांची लाट उसळेल आणि राजकीय असंतोष भडकेल असे मत द. व्हिएटनामच्या अर्थमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. सायगावमध्ये भिकारी, चोरटे, वेश्या आणि बेकार ह्यांची भ्रमंती चालू आहे.

---

## पाकिस्तानमधील ५ व १० रुपयांच्या नोटा रद्द

पाकिस्तान सरकारने ५ व १० रुपयाच्या जुन्या नोटा रद्द करून चलनातून काढून घेण्याचे ठरविल्याची घोषणा केली आहे. जुन्या नोटांच्या बदली नव्या नोटा देण्यात येणार आहेत. अर्थात ही बदलाबदली करण्यासाठी काही मुदत देण्यात आली आहे. जूनच्या १० तारखेनंतर जुन्या नोटा व्यवहारातून बाद झाल्या. पाकिस्तानने ह्या पूर्वी मोठ्या रकमांच्या नोटा अशाच रद्द ठरविलेल्या आहेत. बांगला देश स्वतंत्र होण्याची जी घटना घडली तिचा परिमाण पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर फार वाईट झाला. राजकीय अस्थिरता वाढून नोटांचा साठा करण्याची प्रवृत्ती फोफावली. शिवाय, पाकिस्तानी नोटा देशाबाहेर चोरट्या मार्गाने जाऊ लागल्या. त्यावर उपाय म्हणून ही कारवाई करण्यात आली आहे.

---

# दुसऱ्याचे पैसे वापरा आणि उधळा !

## आजच्या युगातील ' यशा'चा महामंत्र

## व्ययाधिकाराचा स्वार्थासाठी वापर

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

आजच्या युगात जर एखादी देवता तुम्हाला प्रसन्न होऊन म्हणाली,

" भक्ता, तुजप्रद कल्याण असो ! हवा तो वर माग ! "

राजपद ! छे : आता राजेच उरले नाहीत. मंत्रिपद ? नको. कोण जाणे, उद्या मंत्रिमंडळातून उच्चाटन व्हायचे !

धनलाभ, लॉटरी वगैरे ? त्यावरही टॅक्स बसवला आहे सरकारने ! अचानक एवढे पैसे कोठून आले हे आयकर अधिकाऱ्याला पटवून देणेही कठीण. देवता प्रसन्न झाली व पैसे मिळाले हे कारण त्यांना जन्मात पटणारे नाही. आय-कर नियमात या मार्गाने पैसे कमावण्याची व बाळगण्याची तरतूद नाही. हे उत्पन्न बेकायदेशीर ठरून उगाच वर्तमानपत्रात सनसनाटी बातमी यायची !

संततिलाभ ? दो या तीनच्या लाल त्रिकोणी जमान्यात देवाजवळ मागण्यासारखे यात काय आहे ? प्रत्येकाला आपला कोटा पुरा करण्यास पुष्कळ अवधी आहे. देवाची मर्जी होऊन त्या बाबतीत घाई करण्यात अर्थ नाही.

मग आली का पंचाईत ! शाश्वत सुख देईल असे मागणेच या जगात उरले नाही ? सर्व गोष्टींच्या आड सरकार येते ? स्वतंत्रपणे उपभोगता येईल अशी बाबच नाही ? थांबा, निराश होऊ नका. एक बाब अशी आहे की जी तुम्हाला देवकृपेने प्राप्त झाली तर आयुष्यभर विवंचना करायला नको. ती बाब म्हणजे व्ययशक्ती—दुसऱ्याचे पैसे खर्च करण्याचा अधिकार. देवाजवळ 'मी जेथे असेन तेथे त्या क्षेत्रात मला अफाट व्ययशक्ती प्राप्त होऊ दे' असा वर मागा आणि तुम्हांला सर्व काही मिळालेच म्हणून समजा.

तुम्ही जिथे नोकरी वा व्यवसाय करीत असाल तिथे जास्तीत जास्त पैसे खर्च करण्याचे अधिकार मिळवा आणि तुम्हांला किती लाभ होतो ते पाहा. चहूबाजूंनी संपत्ती, ऐश्वर्य, सत्ता तुमच्याकडे धावत येतील.

वरील गोष्टींतील विनोदाचा भाग सोडला तरी आज असे खात्रीने म्हणावेसे वाटते की जगातील सर्व राष्ट्रांत खर्च करण्याची अहमहमिका चालू आहे. निर्धन राष्ट्रेही धनाढ्य राष्ट्रांकडून मदती वा कर्जे मिळवून मोठ्या खर्चाच्या योजना पार पाडीत आहेत व धनाढ्य राष्ट्रेही परतफेडीची फारशी आशा न बाळगता या ना त्या कारणाने या देशांना मदत देत आहेत. त्या योगे त्यांच्या देशांतील उत्पादन विकले जाते व नवीन उत्पादनासाठी खर्च करण्यास ते तयार होतात. कमकुवत देशांना भारी किमतीची युद्धसामग्री विकून अथवा मदत देऊन युद्धे खेळवली जातात. या युद्धांत होणाऱ्या सामग्रीचा आणि धनाचा अतोनात चुराडाही काही देशांच्या अर्थव्यवस्थेला मजबुती आणीत आहे असे स्पष्ट दिसते आहे. असे नसते तर उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम आणि भारत व पाकिस्तान यांच्यात मोठी युद्धे झालीच नसती. या आर्थिकदृष्ट्या दुर्बल राष्ट्रांत युद्धे पेलण्याची कुवत निश्चित नाही. हे देश युद्धाची भाषाही करू शकले नसते. खर्च वाढवून स्वतःची प्रगती करण्याची प्रवृत्ती जशी मोठ्या राष्ट्रांत आहे तशी मोठ्या व्यक्तीतही असते.

आपल्या सभोवती चालणारे व्यवहार पाहिले तरी हे दिसून येईल की प्रत्येक व्यक्ती स्वतःकडे अधिक खर्च करण्याची शक्ती मिळवीत आहे. आपण राजकारणी मनुष्य, कारखानदार आणि सरकारी किंवा खाजगी क्षेत्रांतील अधिकारी यांचीच उदाहरणे घेऊ.

आजतरी बहुसंख्य राजकारणी मनुष्यापुढे देशसेवा, त्याग, जनकल्याण, इत्यादी दुर्मिळ महत्त्वाकांक्षापेक्षा सत्ताग्रहणाचा लोभ अधिक आढळतो. सत्तेशिवाय कार्य होतच नाही ही समजूत झालेली आहे. सत्ता म्हणजे सुद्धा खर्च करण्याचा अधिकार. जिल्हा पातळीवरचा पुढारी असेल तर त्याला तेथील बँकांवर, सहकारी कारखान्यांवर, जिल्हा परिषदेवर, मोक्याची जागा हवी असते. पुढे राज्य मंत्रिमंडळात जागा मिळविण्याची धडपड सुरू असते. ही स्थाने मिळविण्यासाठी त्याला अनेकांना खूष राखावे लागते. अनेकांना कंत्राटे मिळवून द्यावी लागतात. अनेकांना नोकऱ्या शोधून द्याव्या लागतात. पर्यायाने नवीन खर्चाची कामे, नवीन खाती निर्माण करावी लागतात. आणि हे सर्व हाती आलेल्या अधिकाराच्या जोरावरच होऊ शकते. ही व्ययशक्ती हाती असेल तर त्याचे स्वतःचे खर्चही बिनबोभाटपणे पार पाडता येतात. त्या व्यक्तीला सरकारी खर्चाने अथवा निरनिराळ्या संस्थांच्या खर्चाने बंगला, मोटारगाड्या, नोकरचाकर, परदेशप्रवास, रोख भत्ते, देणग्या व इतर उत्पन्न सहज प्राप्त होतात. सग्यासोयऱ्यांचे धंदे वाढवता येतात. त्यांना कंत्राटे, नोकऱ्या देता येतात. सारांश, ही व्यक्ती ज्या अधिकारावर असेल त्या पदाचा उपयोग करून, खर्च वाढवून ती व्यक्ती आपले व कुटुंबियांचे आयुष्य सुखी करू शकते. एरव्ही हे सर्व खर्च स्वतःच्या उत्पन्नातून कर वजा जाता उरलेल्या शिल्लकेतून पिढीजाद श्रीमंत व्यक्तींनाही अशक्य होते. त्यामुळे श्रीमंत माणसेही या मोहाने राजकारणात पुढेपुढे करू पाहतात.

कारखानदार वर्गाची स्थितीही या बाबतीत राजकारणी माणसांप्रमाणेच असते. दिवसेंदिवस व्यक्तींच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर कर वाढत आहेत. नवे नवे सीलिंगचे कायदे येत आहेत. तेव्हा आहे ती खर्चाची पातळी राखण्यासाठी अनेक पिढीजाद श्रीमंत कुटुंबे सहकारी वा जॉइंट स्टॉक कारखानदारीकडे वळत आहेत. या उद्योगात न पडल्यास त्यांची गंगाजळी आटत

जाऊन त्यांच्या कुटुंबियांना सामान्य माणसांचे जिणे जगण्याची पाळी येईल. याउलट ही मंडळी धंद्यात पडली तर मोजक्या भांडवलावर त्यांना बँका व ठेवीदारांकडून प्रचंड रकमा उभ्या करता येतात व त्या भांडवलावर धंदे चालवून या कारखानदारांचे बंगले, मोटारी ( प्रसंगी विमानेसुद्धा ), विश्रांतिगृहे, नियमित परदेशप्रवास, नोकरचाकर, असे सर्वसंपन्न ऐश्वर्य उभे राहू शकते व ते दिवसेंदिवस वाढू शकते. स्वतःच्या संबंधितांचे व्यवसायही पोसता येतात. अनेकांना नोकऱ्या मिळवून देता येतात. पूर्वीच्या संस्थानिकांप्रमाणे काही प्रमाणात आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत स्वायत्त साम्राज्य उपभोगता येते. यासाठी धंदे वाढत्या नफ्यात चाललेच पाहिजेत असे बंधन नाही. फक्त वार्षिक उलाढाल व खर्चाचे मान वाढते ठेवता आले पाहिजे. तोट्यात चालणारे कारखाने भागधारकांना काही लाभांश ( डिव्हिडंड ) देऊ शकणार नाहीत पण चालकांचे सर्व खर्च भागवू शकतात. धंद्यांतून मिळणाऱ्या संस्थाचालकांच्या उत्पन्नावर नफ्याच्या प्रमाणात निर्बंध यासाठीच घातले जात आहेत. अर्थात त्यांना मिळणाऱ्या इतर सोयीसवलतींचा नफ्याशी कायदेशीर संबंध सरकारला अद्याप बसवता आलेला नाही.

फ्रान्ससारख्या देशात धंद्यांत उरणाऱ्या नफ्यावर आयकर बसवण्यापेक्षा धंद्यांत खर्च होणाऱ्या मालाच्या किंमतीवर व धंद्यांत दिल्या जाणाऱ्या वेतनांवर कर बसविले आहेत, ते हे खर्च नियंत्रित करण्याच्या उद्देशानेच. यामुळे धंद्यांतील खर्च अवास्तव वाढवण्यास आळा बसून सरतेशेवटी नफ्याचे प्रमाण वाढेल ही अपेक्षा आहे. भारतातही धंद्यानिमित्त होणाऱ्या प्रवासखर्चांना, जाहिरातींवरील खर्चांना, आयकरांतून मोजक्या प्रमाणांतच सूट ठेवली आहे, ती हे खर्च चालकांनी आवश्यक तेव्हा व आवश्यक तेवढेच करावेत म्हणून. ज्या कारखान्यांची वार्षिक उलाढाल मोठी व कर्ज काढण्याची ऐपत मोठी ते कारखानदार सर्वसाधारणपणे बडे समजले जातात. अशा कारखान्यांभोवती संबंधित उद्योगांचे, राजकारणी माणसांचे व नोकरांचे मोठे जाळेच उभे राहते. प्रमाणात वार्षिक उलाढाल करणाऱ्या व त्यावर बऱ्यापैकी नफा मिळवणाऱ्या कारखानदाराचे व्यक्तिगत उत्पन्न व सामाजिक दर्जा, धंद्यातील नफ्याचे प्रमाण चांगले असूनही, फारसे वाढत नाहीत. याउलट, अफाट विस्तार करणाऱ्या कारखानदारांचे उत्पन्न व प्रतिष्ठा धंदे नीट चालत नसताही वाढत राहतात. कारण धंद्यात होणाऱ्या वाढत्या खर्चाचा मोठा वाटा संबंधितांच्या हितासाठी ठेवण्याची शक्ती या कारखानदारांची मोठी असते.

सरकारी व खाजगी कंपन्यातील अधिकाऱ्यांची महत्त्वाकांक्षाही थोडीफार वरील प्रकारचीच असते. प्रत्येक सरकारी अधिकारी ज्या पातळीवर काम करीत असेल तेथे स्वतःचे अखत्यारात खर्चाची कामे अधिकाधिक कशी राहतील हे पाहात असतो. त्यामुळे त्याचेही महत्त्व, सत्ता व प्रसंगी अनधिकृत उत्पन्न वाढत राहते. वर्षाला १॥ ते २ कोटी रुपयांच्या कामावर देखरेख ठेवणारा इंजिनीयर जर एखाद्या सरकारी संशोधन केंद्रात किंवा शिक्षण संस्थेत बदली झाला तर असंतुष्ट राहतो. त्याच्या पगारात अगर व्यावसायिक दर्जात कोणतीही घट झाली नाही तरी त्याची व्ययशक्ती जर कमी झाली तर त्याला ती शिक्षा वाटते. आयुष्य निराशामय वाटते. खाजगी कंपन्यांतही हीच परिस्थिती आढळते. प्रत्येक अधिकारी स्वतःच्या खात्यामार्फत होणारे खर्च व हाताखालच्या माणसांची संख्या वाढवण्यास उत्सुक असतो. खर्चाची कामे वाढल्याने कंपनीचा विस्तार होत आहे, खात्यांची प्रगती चालू आहे, असा आभास निर्माण करता येतो. त्यायोगे संबंधित कर्मचारीवर्ग, कंत्राटदार, वगैरेही खूष राहतात. याउलट जर एखादा अधिकारी जर वर्षानुवर्षे चालणारी खर्चिक कामे बंद करू लागला तर त्याची लोकप्रियता कमी होऊन तो संबंधितांच्या मर्जीतून उतरू लागतो. वाढता खर्च हे इथेही वाढत्या कामगिरीचे द्योतक मानले जाते. बरेच अधिकारी केवळ खर्च करण्याच्या अधिकारावर समाधान मानून त्यातून स्वतःचा विकास घडवून आणतात व यासाठीच प्रसंगी कमी पगारावरही दुय्यम दर्जाच्या कंपन्यांतून काम करतात. त्यांना बड्या कंपन्यांत थोड्या अधिक पगाराची नोकरीही मिळवता येईल पण त्यांची व्ययशक्ती तेथे कमी होईल या भीतीने ते आहेत तेथेच समाधानी राहतात.

वरील विवेचनावरून सहज लक्षात येईल की व्ययशक्ती ही सर्वांत मोठी शक्ती आहे आणि सर्वजण आपली नोकरीतील, व्यवसायातील, राजकरणातील ही शक्ती जोपासण्यात मग्न असतात. देवकृपेने ही शक्ती तुम्हालाही प्राप्त झाली व तुमच्याजवळ ती कायम राहिली तर तुमची व तुमच्या कुटुंबियांची चलती होणे अटळ आहे.

---

**शिखिस्तानची मागणी**—पंतप्रधान इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय दूषतीकरण परिषदेसाठी स्वीडनच्या राजधानीला गेल्या होत्या. त्या वेळी त्यांना शिखिस्तानच्या मागणीला तोंड द्यावे लागण्याचा संभव होता. पंजाबमधील एक माजी मंत्री शिखांचा एक गट घेऊन ह्या निदर्शनासाठी स्टॉकहोमला जाण्याचा विचार करीत होते. ह्या मंत्र्यांनी पाकिस्तान रेडिओवरून अलीकडे भारत विरोधी भाषणही केले आहे. स्वीडनला जाण्यासाठी पासपोर्ट लागत नाही.

**आंबरसाची निर्गत**—भारताने १९७१-७२ च्या पहिल्या आठ महिन्यांत ८८·२ लक्ष रु. किंमतीच्या आंबरसाची निर्गत केली. १९७०-७१ च्या बारा महिन्यांत ८६·२ लक्ष रु. च्या आंबरसाची निर्गत झाली होती.

**१७ पौंड वजनाचे पुत्ररत्न**—सिडने येथील मिसेस टर्वे ही स्त्री प्रसूत होऊन तिला १७ पौंड वजनाच्या पुत्राचा लाभ झाला. नैसर्गिक प्रसूतीने होणाऱ्या अपत्यांच्या वजनात हा जागतिक विक्रम ठरेल.

### दरोडेखोरांजवळ हत्यारे आली कोठून?

मध्यप्रदेशातील चंबळ नदीचे खोरे आणि बुंदेलखंडातील काही जिल्हे ह्यांतून सशस्त्र दरोडेखोरांनी गेली काही वर्षे धुमाकूळ घातला होता. आता सुमारे ४०० दरोडेखोरांनी स्वत: होऊन शरणागती पत्करली आहे. त्यांपैकी अनेक जणांना कृतकर्माबद्दल उपरती झाल्याचेही सांगण्यात येत आहे. तथापि ह्या दरोडेखोरांना शस्त्रास्त्रे व दारुगोळा कोठून मिळत असे ह्याबद्दल चौकशी करणे अगत्याचे आहे. तशी ती करण्यातही येत आहे. दरम्यान, त्यांच्याजवळ सापडलेल्या शस्त्रांची छाननी करण्यात येत आहे. गेल्या एप्रिलमध्ये २९२ दरोडेखोर पोलिसांच्या स्वाधीन झाले. त्यांनी १७४ शस्त्रास्त्रे आणि बराच दारूगोळा पोलिसांच्या ताब्यात दिला. पोलिसांकडून शस्त्रास्त्रांची कसून तपासणी करण्यात आली. प्रत्येक हत्यार सुटे करण्यात येऊन पहाणी करण्यात आली. त्यावेळी असे आढळले की कित्येक हत्यारावरील नंबर खोडून टाकलेला आहे. तरीपण त्यांच्यावरील मूळच्या खुणा शोधून काढण्यात आल्या. काही हत्यारे निरनिराळ्या हत्यारांतील भाग जुळवून बनविण्यात आली होती. अशी जुळणी फक्त हत्यारांच्या कारखान्यातच होऊ शकते असे पोलिसांचे म्हणणे आहे. दरोडेखोरांकडून मिळालेल्या १७४ हत्यारांपैकी १४० हत्यारांवर संरक्षण खात्याच्या खुणा आढळून आल्या. फक्त ३४ हत्यारे मुलकी नागरिकांची होती. मध्यप्रदेशच्या गुप्तहेर खात्याने अनेकदा असे जाहीर केलेले आहे की दरोडेखोरांना मिळणारी बहुतेक हत्यारे संरक्षण खात्याच्या कारखान्यातून आलेली आहेत. अशा एका प्रकरणात एका वरिष्ठ अधिकाऱ्याची बदलीही करण्यात आलेली आहे.

---

### आफ्रिकेतील देशांत पूर्वीपेक्षाही आता श्वेतवर्णियांची संख्या जास्त

आफ्रिकेतील कृष्णवर्णीय ३१ देश श्वेतवर्णीय साम्राज्यवादी राज्यकर्त्यांचे जू झुगारून देऊन स्वतंत्र झाले, त्याला दहा-बारा वर्षे सुद्धा झाली नसतील. परंतु, पूर्वी त्या देशांना वसाहतीचा दर्जा होता तेव्हापेक्षा अधिक श्वेतवर्णीय आज तेथे आहेत. साम्राज्यवाद्यांचे हस्तक म्हणून पूर्वी ते तेथे होते; आता ते नव्या राष्ट्रांचे मदतनीस म्हणून आहेत. ठराविक वर्षांच्या कराराने ते तेथे जातात आणि आवश्यक तो तज्ज्ञ, सल्ला, मदत, वगैरे देतात. नव्या काही राष्ट्रातून अद्याप सरकारी नोकरीत श्वेतवर्णीय आहेत. काहीजण जज्जांच्या जागीही कामे करीत आहेत. आर्थिक मदत देणारी श्वेतवर्णीयांची राष्ट्रे स्वत:चे तज्ज्ञ लोकही पाठवितात. शिक्षक, बँकर, नभोवाणी तज्ज्ञ, खतविषयक संशोधक, नर्सेस, विक्रीतज्ज्ञ, पोलीसतज्ज्ञ, टेलिफोनतज्ज्ञ, बीजतज्ज्ञ, बांधकामतज्ज्ञ, इत्यादी भूमिकांतून ते कामे करतात. कृष्णवर्णियांची सरकारे, जनता श्वेतवर्णियांची आर्थिक मदत आणि तज्ज्ञ स्वीकारीत आहेत; पूर्वीची आढी दूर झाली आहे.

---

### हिंदच्या कापडाचे रशिआ मोठे गिऱ्हाईक

हिंदमध्ये तयार होणाऱ्या सुती कापडाचे रशिआ फार मोठे गिऱ्हाईक झाला आहे. चालू वर्षात भारताला रशिआकडून २० हजार टन कापूस मिळणार आहे. त्याच्या बदली भारत रशिआला १२.६ कोटी मीटर कापड आणि ५० लाख टॉवेल्स पुरविणार आहे. ह्या व्यवहारात भारताला १६.६ कोटी रुपये मिळणार आहेत. रशिआकडून मिळणाऱ्या कापसाचे कापड कोठल्या गिरण्यातून बनविण्यात यावे ते ठरविण्यासाठी रशिआच्या खरेदी संघटनाचे एक मंडळ गेल्या मार्चमध्ये भारतात आले होते. मंडळाने हिंदी गिरण्यांची पहाणी करून विविध प्रकारच्या १२.४ कोटी मीटर लांबीच्या कापडाची मागणी नोंदविली. त्याशिवाय १ लाख डझन हातरुमालांचीही मागणी नोंदविली. ह्या मालाची किंमत २४२ कोटी रुपये होईल.

---

### कृत्रिम दुधाच्या निर्मितीबद्दल हिंदी शास्त्रज्ञाचा सन्मान

कलकत्ता येथील श्री. कुलबीर साबरवाल ह्या हिंदी विद्यार्थी-शास्त्रज्ञाने अमेरिकन ऑइल केमिस्ट सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांसाठी दिले जाणारे सन्मानपदक मिळविले आहे. श्री. साबरवाल ह्यांनी सोयाबीनमधील प्रथिनांश, अन्न खनिजे आणि पाणी ह्यांचे मिश्रण करून कृत्रिम दूध बनविले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हे दूध गाईच्या दुधापेक्षा चवीला निराळे लागले तरी आवडण्यासारखे आहे. भारतात ५० टक्क्यांपेक्षा अधिक दुधाचा पुरवठा म्हशीच्या दुधाचा असतो. त्यात चरबीचे प्रमाण ६.५ टक्के अगर अधिक असते. परंतु दुधाचा पुरवठा अपुरा असल्याने कमी कसाच्या दुधात दुधाची भुकटी मिसळून ते अधिक स्निग्ध करावे लागते. अशा वेळी दुधाची भुकटी आयात करण्यापेक्षा सोयाबीनचे मिश्रण अधिक स्वस्त पडेल.

---

### कागदाच्या सरकारी गिरणीला तोटा

१९७०–७१ साली नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स लि. ह्या सरकारी मालकीच्या कागद कारखान्याला ५९.२५ लाख रुपये तोटा आला. राज्यसभेला सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. १९६९–७० साली कारखान्याला ९२.४५ लाख रुपये तोटा आला होता. अहवालाच्या वर्षी कारखान्याने ठरविलेल्या ३० हजार टन उद्दिष्टापेक्षा ७,२७० टन कागद अधिक निर्माण केला. परंतु १९६९–७० साली ४२४.३७ लाख रुपयांच्या कागदाची विक्री झाली होती. ती गेल्या वर्षात ४१९.६५ लाख रु. इतकीच झाली. कागद करण्यासाठी लागणारा परदेशी लगदा वापरल्यामुळे कारखान्याला तोटा आला असे सांगण्यात आले.

---

## गुन्ह्यानंतर ३७ वर्षांनी खुनी मनुष्य स्वतः होऊन पोलिसांच्या स्वाधीन

### मनाच्या टोचणीचा परिणाम

३७ वर्षांपूर्वी, ३ नोव्हेंबर १९३५ रोजी, लॉनी कॉस ह्या एक अमेरिकन माणसाने चाकूचा वार करून एडवर्ड बोझिअरचा खून केला आणि पोलिसांनी गुन्हा नोंदवला. लॉनी कॉस पळून गेला आणि नवे नाव धारण करून ठिकठिकाणी राहिला. ७ जून १९७२ रोजी तो जॅकसनव्हिलाच्या शेरीफच्या कचेरीत जाऊन पोलिसांच्या स्वाधीन झाला. १३ वर्षांपूर्वी एके दिवशी त्याची सदसद्विवेक बुद्धी जागृत होऊन त्याला सतावू लागली आणि गुन्हा कबूल करण्यास तिने त्यास सांगितले. पोलिसांच्या स्वाधीन झाल्यानंतर त्याला हायसे वाटू लागले आहे. १९३५ सालच्या गुन्ह्याचे साक्षीदार शोधून काढण्यात आता पोलीस गुंतले आहेत. कॉसचे वय ६६ वर्षांचे आहे.

---

## पाश्चात्य वृत्तपत्रकारांमधील सर्वांत लोकप्रिय शब्द "लैंगिक भावना"

भाषाशास्त्राच्या एका फ्रेंच संशोधकाने पाश्चात्य वृत्तपत्रांविषयी नुकतीच एका मनोरंजक आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. पाश्चात्य वृत्तपत्रांत सर्वांत जास्त कोणता शब्द वापरला जातो याची नोंद या संशोधकाने केली. तसेच इतर क्रमांकाने कोणते शब्द वारंवार वापरले जातात याचे आकडेही त्याने गोळा केले नंतर त्याने १९७० च्या आकडेवारीची तुलना १९७१ च्या आकडेवारीबरोबर केली. १९७० साली 'प्रेम' हा शब्द पाश्चात्य वृत्तपत्रांनी सर्वांत जास्त वेळा वापरला. त्या पाठोपाठ क्रमाने 'अभिनिवेश', 'स्त्री', 'फॅशन' व 'हृदय' या शब्दांचा वापर झाला. १९७१ मध्ये या आकडेवारीत बरीच स्थित्यंतरे झाली. 'प्रेमा'चा पहिला नंबर जाऊन तो नवव्या नंबरला घसरला! १९७१ साली सगळ्यात जास्त वापर 'लैंगिक भावना' या शब्दाचा झाला. त्या खालोखाल 'युद्ध', 'चंद्र' 'अमली पदार्थ' व 'अणू' या शब्दांचा वापर झाला.

---

## क्रांतिकारकाचे पिस्तूल परत मिळविले

प्रसिद्ध क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद ह्यांनी वापरलेले पिस्तूल परत मिळविण्यात उत्तर प्रदेश सरकारला यश आले आहे. सर जॉन बॉवर ह्यांनी ते सरकारला देणगी म्हणून दिले आहे. ता. २७ फेब्रुवारी १९३१ ह्या दिवशी पोलिसांशी झालेल्या चकमकीत चंद्रशेखर आझाद ह्यांनी त्याचा उपयोग केला होता. त्यांना पकडण्याची कामगिरी सर जॉन बॉवर ह्यांच्याकडे होती. चकमकीत आझाद ठार झाल्यावर सुपरिटेंडेंट ऑफ पोलिस सर बॉवर ह्यांनी ते आठवण म्हणून इंग्लंडला नेले होते. हे पिस्तूल स्वयंचलित असून त्यात १० गोळ्या एका वेळी भरता येतील. ते अमेरिकेत १९०३ साली तयार केलेले आहे. आता ते समारंभपूर्वक लखनौ येथील वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात येणार आहे.





पाणी.... पाणी

हवं तेव्हा, हवं तितकं

शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.

त्या साठी भरवश्याचं असं 'एकच'

किर्लोस्कर एंजिन

३ ते १५ हार्स पॉवर

किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड,

रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-3

... यांना या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे. Tom & Bay/KO-7182-M

## दि स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. चा १२% डिव्हिडंड

'स्वस्तिक' ने ह्यापूर्वी १९५६ च्या कंपनी कायद्याच्या २०५ (२) (अ) ह्या कलमाप्रमाणे घसारा काढला, त्याऐवजी आता २०५ (२) (ब) ह्या कलमाप्रमाणे काढण्यात येत आहे. त्यामुळे १९७१ सालाकरिता १३,८९,२९९ रु. नी कमी तरतूद पुरेशी आहे. त्या कलमाप्रमाणे, १ जानेवारी, १९६१ पासून आतापर्यंत घसाऱ्याची ५४,३४,९५५ रु. जास्त तरतूद केली गेली, ती १९७१ च्या ताळेबंदात जनरल रिझर्व्हमध्ये परस्पर वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे जनरल रिझर्व्ह तेवढ्या रकमेने वाढला आहे. अहवालाच्या वर्षी कंपनीला घसारा काढून २४,३०,९७० रु नफा झाला. इक्विटी भागांवर १२% करपात्र डिव्हिडंड संचालक मंडळाने सुचविला आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे 'स्वस्तिक' मध्ये विलिनीकरण झाले, त्यामुळे 'स्वस्तिक' ला २,०९,८७,७०० रुपयांचे ५½ गव्हर्मेंट ऑफ इंडिया–बँक्स (ॲक्विझिशन अँड ट्रॅन्स्फर) बाँड मिळाले. ते विकण्यात आले, त्यात 'स्वस्तिक'ला १९,३७७ रु. तोटा आला. तथापि, बँकेची जिंदगी तिच्या देण्यांपेक्षा १,३६,७२९ रु. नी अधिक भरली; ही जादा रकम जनरल रिझर्व्हकडे वर्ग करण्यात आली आहे. बँकेच्या विलिनीकरणाची योजना ३१ डिसेंबर, १९७१ रोजी अमलात आली. म्हणजे, ज्या सुमारे ९,००० भागधारकांनी 'स्वस्तिक'चे भाग घेण्याचे मान्य केले, त्यांना १९७१ सालासाठी एका दिवसाचे डिव्हिडंड मिळेल. त्यांच्या डिबेंचर्सवरील व्याजाबरोबरच हे डिव्हिडंड त्यांच्याकडे जुलैमध्ये रवाना होईल. ज्या भागधारकांनी रोख रकम मागितली, ती त्यांना देण्यात आली. त्यामुळे 'स्वस्तिक'कडे १९,३६,६०० रु. ची ८% कन्व्हर्टिबल रिडीमेबल डिबेंचर्स मंजूर होऊनही तशीच राहिली, त्यांची विक्री करण्याचा अधिकार संचालक मंडळाला देणारा ठराव वार्षिक सभेत मांडण्यात येईल. ही विकण्यात आली, म्हणजे 'स्वस्तिक'ला तेवढ्या रकमेचे दीर्घ मुदतीचे भांडवल मिळेल.

---

## अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांवर गदा

स्वतःचे अभ्यास स्वखर्चाने पुरे करण्याची कुवत असणाऱ्या परदेशीय विद्यार्थ्यांनाच प्रवेश देता येईल अशा आशयाचा कायदा अमेरिकेतील राज्य सरकारे करणार आहेत. एका वर्षानंतर आपण मिळवू आणि शिकू अशा अपेक्षेने पूर्वी परदेशी विद्यार्थी अमेरिकेत जात असत. अमेरिकेत बेकारी वाढली आहे, त्यामुळे परदेशीय विद्यार्थ्यांवर ही गदा येणार आहे.

---

## सिंधीमध्ये देवनागरी व अरबी लिपीत क्रमिक पुस्तके

सिंधी भाषेमध्ये, देवनागरी आणि अरबी लिपीत क्रमिक पुस्तके तयार करण्यासाठी ४ थ्या योजनेत एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## दि बँक ऑफ कराड लि. चा रौप्यमहोत्सव



श्री. ल. म. देशपांडे
संस्थापक



श्री. म. वि. खंडकर
विद्यमान चेअरमन

दि बँक ऑफ कराड लि. ची स्थापना १२ मार्च, १९४९ रोजी कै. ल. म. तथा नानासाहेब देशपांडे ह्यांनी केली. उद्योगमहर्षी वि. रा. वेलणकर, कै. शं. प्र. आगले, कै. पांडुअण्णा शिराळकर, हे बँकेचे प्रमुख प्रवर्तक असून बँकेच्या संस्थापकांपैकी श्री. रा. अ. अराणके, श्री मा. ग. परांजपे व डॉ. वा. गो. देशपांडे हे आजही संचालक मंडळावर आहेत. बँकेच्या प्रारंभीचे मॅनेजर श्री. म. वि. खंडकर हेच आजचे बँकेचे चेअरमन आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर आहेत. त्यांचा बँकेच्या धंद्यातील अनुभव, निष्ठा, मनमिळाऊ स्वभाव, प्रामाणिकपणा, कर्तबगारी, ह्यामुळे बँकेची एवढी प्रगती होऊ शकली. १९६८ च्या जूनमध्ये बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला. समाजातील दुर्बल घटकांस ही बँक मदत करते. लघुउद्योग, शेतीव्यवसाय, मोटार ट्रान्सपोर्ट, छोटे व्यापारी, इत्यादींच्या कर्जात बँकेने मोठी गुंतवणूक केली आहे. आम्ही बँकेचा उज्ज्वल उत्कर्ष चिंतितो.

---

## टेलिफोन एक्स्चेंजच्या सदोष मीटर्सचा परिणाम

पुण्यातील कॅन्टोन्मेंट भागातील टेलिफोन एक्स्चेंजमधील मीटर्सनी आपले काम नोव्हेंबर १९७१ ते फेब्रुवारी १९७२ ह्या तीन महिन्यांत नीट न केल्यामुळे खात्याचे ८ लक्ष रुपयांचे उत्पन्न बुडाले. प्रत्यक्ष झालेल्या कॉल्सपेक्षा मीटर्सनी कमी कॉल्स दाखविले. टेलिफोन खात्याने सुमारे ५,५०० ग्राहकांना हे नुकसान भरून काढण्यासाठी पुरवणी–बिले धाडली आहेत. ऑगस्ट १९७१ ते ऑक्टोबर १९७१ ह्या तिमाहीत प्रत्येक ग्राहकाने जेवढे कॉल्स केले असतील, त्यांच्या अनुरोधाने ही जादा बिले करण्यात आली आहेत.

## वांचू कमिटीच्या सूचनांवरील चर्चेत मतभेद

वांचू कमिटीने करचुकवे आणि काळा पैसेवाले ह्यांविरुद्ध करावयाचे काही उपाय सुचविले आहेत. कमिटीने केलेल्या अहवालाची चर्चा लोकसभेच्या आर्थिक सल्लागार समितीत झाली. काही खासदारांच्या मताने कमिटीने केलेल्या शिफारशी बड्या धंदेवाल्यांना अनुकूल अशा आहेत. काही जणांनी कर चुकविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी प्राप्ती कराचे दर कमी करण्याची कमिटीची सूचना उचलून धरली. समितीत झालेल्या चर्चेत काही सूचनाही करण्यात आल्या. मोठ्या रकमांच्या नोटा रद्द करण्याची सूचना करण्यात आली. चित्रपटसृष्टीतील तारे आणि वकील ह्यांच्यावर विशेष लक्ष ठेवण्यात यावे असाही युक्तिवाद करण्यात आला. आणखी एक सूचना अशी करण्यात आली की, बड्या उद्योगधंदेवाल्यांची बँकेतील खाती आणि त्यांच्या नावांनी असलेले बँकेतील लॉकर्स ह्यांची तपासणी करण्याचा अधिकार सरकारने स्वत:कडे घ्यावा. सध्या प्राप्तीकरापासून मुक्त असणाऱ्या उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात यावी असा अभिप्राय काही खासदारांनी व्यक्त केला. त्यांच्या मताने करमुक्त उत्पन्नाची मर्यादा १० हजार रुपये जरी नाही तरी ७,५०० रु. पर्यंत वाढविण्यात यावी. कर चुकविणाऱ्यांना कायद्यात सांगितलेली शिक्षा वाढविण्यात यावी यावर सर्वच खासदारांचे एकमत झाले. एका सभासदाने अशी माहिती दिली की, रशियात नट, सिनेधंद्यातील तज्ञ आणि इतर व्यावसायिक खूप पैसा मिळवितात, पण त्यांच्यावर अवघा ७ टक्के प्राप्तीकर बसविण्यात येतो. मग भारतामधील नटांनी व वकिलांनीच काय पाप केले आहे? पानवाल्यासारखे छोटे धंदेवालेसुद्धा कर चुकविण्यात तरबेज असतात इकडेही लक्ष वेधण्यात आले.

---

## कराचा दर कमी करून उपयोग होणार नाही

वांचू कमिटीच्या अहवालावर विचार करण्यासाठी दिल्ली येथे अर्थशास्त्रज्ञांचा परिसंवाद भरविण्यात आला होता. कमिटीच्या अहवालात अशी एक शिफारस आहे की, प्राप्तीकराचा जास्तीत जास्त दर सध्या ९७.७५ टक्के आहे तो ७५ टक्यांपर्यंत खाली उतरविण्यात यावा. असे केल्याने कर चुकविण्याची प्रवृत्ती कमी होईल. पण परिषदेत व्यक्त करण्यात आलेल्या मतांवरून वांचू कमिटीची ही शिफारस अर्थशास्त्रज्ञांना पटलेली दिसत नाही. बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांनी असे मत व्यक्त केले की, प्राप्तीवरील कर चुकविण्याची वृत्ती उत्पन्नाच्या सर्व पातळ्यांवर दिसून येते. कमी उत्पन्नावरील कराचे दर कमी असले तरी ह्या वृत्तीला आळा बसलेला नाही. मोठ्या उत्पन्नावरील कराचे दर जबर असल्यामुळे फार तर कर चुकविण्याचा मोह अधिक जोरदार होत असेल. ह्याचा अर्थ दर कमी केल्यामुळे कर चुकविण्याची प्रवृत्ती नाहीशी होईल असा करता येत नाही. शिवाय ज्या सामाजिक ध्येयासाठी कराचे जबर दर आकारण्यात येत आहेत त्यांच्याशी सुसंगतपणा राखावयाचा असेल तर जबर दर कमी करून चालणार नाही. तीप आणि पत्नी ह्यांची उत्पन्ने एकत्र करून कर आकारण्यात यावा काय, ह्या प्रश्नासंबंधी परिसंवादात मतभेद दिसून आले. बहुतेकांचे मत असे पडले की, असे करण्यात यावे; ह्याला अपवाद फक्त प्रत्यक्ष काम करून पैसे मिळविणाऱ्या स्त्रियांचा असावा. काही-जणांनी असे मत व्यक्त केले की, पतिपत्नीचे उत्पन्न कर-आकारणीसाठी एकवट धरले गेल्यास स्त्रियांना रोजगार मिळण्यावर त्याचा वाईट परिणाम होईल.

---

## एस्. टी. च्या दरात ४७% वाढ?

सध्याचे एस्. टी. चे भाडे किलोमीटरला ३.५ पैसे आहे ते ५ पैसे करण्यात यावे, अशी महाराष्ट्र स्टेट रोड ट्रॅन्स्पोर्ट कॉर्पोरेशनने सरकारकडे मागणी केली आहे. सरकारने ही दरवाढ मान्य केल्यास कॉर्पोरेशनचे उत्पन्न २१ कोटी रु. नी वाढेल. पण त्यापैकी ४.४५ कोटी रु. उतारूंवरील कर वजा जाता कॉर्पोरेशनला १६.५५ कोटी रु. जादा मिळतील. १९४८ सालानंतर दरवाढ एकदाही झालेली नाही.

---

## प्रतिवर्षी १,००,००० स्कूटर्स उत्पादनक्षमतेचा नवा कारखाना

इटलीमध्ये मेसर्स इनोसेंटीचा लँब्रेटा स्कूटर्सचा कारखाना आहे, तो जसाच्या तसा ('अॅज ईज, व्हेअर ईज') आणून भारतात लखनौ येथे उभारण्यात येईल. त्यासाठी एक कंपनी स्थापन केली जाईल. त्यात भारत सरकारचे ५१% भाग असतील, मेसर्स इनोसेंटी ह्या फर्मला २०% भाग मिळतील, उरलेले २९% भाग ऑटोमोबाइल प्रॉडक्टस् ऑफ इंडिया आणि भारतीय नागरिक ह्यांना दिले जातील. कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १,००,००० स्कूटर्सची आहे. दोन वर्षांनी उत्पादनास प्रारंभ होईल.

---

## अमेरिकेत डी. डी. टी. च्या वापरास बंदी

ह्या वर्षअखेरपासून अमेरिकेत डी. डी. टी. वापरास जवळ-जवळ संपूर्ण बंदी घालण्यात येईल डी. डी. टी. च्या वापरामुळे फायद्यापेक्षा तोटे अधिक होतात, असे आढळून आले आहे भारत, दक्षिण अमेरिकेतील देश आणि आफ्रिकेतील देश ह्यांत मलेरियाच्या प्रतिबंधासाठी डी. डी. टी. चा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेला आहे.

## ऑक्सफर्ड विद्यापीठांतील व्यसनासक्त विद्यार्थी

ऑक्सफर्ड विद्यापीठ हे ब्रिटनमधील परंपरागत मूल्यांचे रक्षण करणारी एक संस्था मानली जाते. परंतु ह्या विद्यापीठातील ११,००० विद्यार्थ्यांपैकी जवळ जवळ एक चतुर्थांश विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या तरी अंमली पदार्थांचे सेवन करीत असतात.

---


### आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांच्या खास सवलती रद्द


स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेला आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांचा वर्ग पोलादी चौकट ह्या नावाने ओळखला जात असे. जनतेपासून अलग ठेवण्यात आलेले हे वरिष्ठ नोकर कर्तबगार नसत असे नाही. त्यांच्या राहणीचा दर्जा अर्थातच सामान्य लोकांपेक्षा बराच उच्च असे. ह्याच वरिष्ठ नोकरांच्या मदतीने ब्रिटिश सरकारने देशाचा कारभार हाकला. अजूनही त्यातील काही अधिकारी काम करीत आहेत. आय्. सी. एस्. अधिकाऱ्यांचा वर्ग १८५० पासून निर्माण करण्यात आला. १८५८ साली हिंदी लोकांनाही ह्या वर्गाची द्वारे खुली करण्यात आली. सध्या देशात १११ आय्. सी. एस्. अधिकारी कामावर आहेत. त्यांपैकी ८१ सर्वसाधारण राज्यकारभारात आहेत, २६ पोलीस खात्यात आहेत आणि ४ हायकोर्टात न्यायमूर्ती आहेत. ह्या वर्षी २२ अधिकारी सेवानिवृत्त होणार आहेत. १९७९ साली शेवटचा अधिकारी सेवानिवृत्त होईल. लोकसभेने ह्या अधिकाऱ्यांना खास हक्क देणारे घटनेतील ३१४ वे कलम रद्द केले आहे. त्यामुळे कामावर असणाऱ्या अधिकाऱ्यांबरोबरच २८५ आय्. सी. एस्. सेवानिवृत्तांवरही परिणाम होणार आहे. आय. सी. एस. अधिकाऱ्यांची पगाराची श्रेणी उच्च असे. त्यांचे सेवानिवृत्तीचे वयही ६० अगर ३५ वर्षे नोकरी असे असे. रजेसंबंधी त्यांना खास वेगळे नियम लागू होत. त्यांचे पेन्शन त्यांना पौंडाच्या चलनात घेता येत असे. त्यांच्याविरुद्ध भेदभाव दाखविण्याविरुद्ध मुद्दाम हमी देण्यात आलेली होती. स्वातंत्र्यपूर्वकाली नोकरीत असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना व्यक्तिशः पत्रे पाठवून खास हक्कांची हमी देण्यात आली होती व १९४७ च्या स्वातंत्र्य कायद्यात ते ग्रथित करण्यात आले होते. नंतर राज्यघटनेच्या ३१४ व्या कलमात त्यांचा समावेश करण्यात आला.

---

### अशुद्ध तेलाचा पुरवठा अपुरा पडणार नाही

इराकने इराक पेट्रोलिअम कंपनीचे राष्ट्रीयीकरण केले आणि तेलाच्या विक्रीला बंदी केली. तथापि ह्या बंदीचा भारताला होणाऱ्या पुरवठ्यावर काही परिणाम होणार नाही. त्याचे कारण असे आहे की भारत मुख्यतः इराण व सौदी अरबस्थान ह्या देशांकडून अशुद्ध तेलाची आयात करतो. उलट, इराककडून अधिक पुरवठा होण्याची शक्यता आहे. काही काळापूर्वी भारत आणि इराक ह्यांच्या दरम्यान व्यापारी बोलणी झाली होती. त्यावेळी इराकने दरसाल १० लाख टन अशुद्ध तेल पुरविण्याची तयारी दाखविली होती. त्याशिवाय दरसाल पुरवठ्यात वाढ करण्याचेही इराकतर्फे सुचविण्यात आले होते. इराकमधील एका अविकसित भागातील तेलाच्या खाणीमधून हे तेल देण्यात येणार होते. आता तेथून तेल मिळण्याची शक्यता वाढली आहे.

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड






... ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्राक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)